# सौ. सुनंदा वामनराव देसाई विज्ञान रंजन कथा स्पर्धा 2010

समाजात विज्ञान रंजन साहित्याची (Science Fiction) फार आवश्यकता असते. पाश्चिमात्यांकडे ज्यूल्स व्हर्न, एच.जी. वेल्स, आयझॅक ॲसिमोव्ह, तर आपल्याकडे डॉ. जयंत नारळीकर, डॉ. बाळ फोंडके वगैरे लेखकांनी असे उत्कृष्ट साहित्य निर्माण केलेले आहे. मराठी भाषेत असे साहित्य कमी आहे. या कार्याला चालना मिळण्यासाठी मराठी विज्ञान परिषद 1970 सालापासून 'विज्ञान रंजन कथा स्पर्धा' सातत्याने आयोजित करीत आहे.

कथेला विज्ञानाची बैठक हवी आणि भाषेचे लालित्यही हवे. केवळ कथा नको किंवा केवळ विज्ञान नको, ह्या दोन्हींचा मिलाफ हवा. तसेच, विज्ञान रंजन कथेतील विज्ञान ज्ञात सिद्धान्तांचे व ज्ञात वस्तूंचे हवे. ज्ञात विज्ञानाच्या पुढे जाऊन थोड्या कल्पकतेतून भविष्यकालीन संभाव्य विज्ञानाचा मागोवा घेणारे सिद्धान्त असले तरी चालतील. कथा ओघवती असावी, तसेच वातावरणनिर्मिती चित्तवेधक आणि वाचकांची उत्कंठा वाढवणारी असावी. कथा कंटाळवाणी होत नाही ना, याचा प्रत्यय कथालेखकाने स्वत:च घ्यावा. कथालेखकांनी विज्ञानाचे एखादे प्रमेय, सूत्र, संकल्पना घेऊन त्यावर आधारित कथा लिहावयाचा प्रयत्न करावा. कथा स्पर्धेसाठी अंतिम दिनांक 30 सप्टेंबर, 2010 आहे.

**पहिल्या तीन सुयोग्य विज्ञान रंजन कथांसाठी अनुक्रमे रु. 1000/-, 750/- व 500/- ची पारितोषिके दिली जातील.**

**स्पर्धेचे नियम :**

1. **विज्ञान रंजन कथा स्वत:ची असल्याचे प्रतिज्ञापत्र प्रत्येक लेखकाने कथेबरोबर देणे अनिवार्य आहे.**
2. स्पर्धेत कोणालाही भाग घेता येईल, **मात्र ज्या व्यक्तीस या स्पर्धेत आजवर दोनदा पारितोषिक मिळाले आहे, त्यांनी आपली कथा पाठवू नये.**
3. शब्द संख्या 2000 ते 3000 असावी. लिखाण कागदाच्या एकाच बाजूला असावे. स्वहस्ताक्षरात असल्यास उत्तम. कागद ए-4 आकाराचा असावा.
4. साहित्याबरोबर लेखकाने आपले नाव व पिनकोडसह संपूर्ण पत्ता द्यावा. संपर्क दूरध्वनी शक्य असल्यास एस.टी.डी. कोडसह द्यावा. तसेच इ-मेल पत्ता असल्यास तोही कळवावा. **शीर्षकासह ही सर्व माहिती पहिल्या पानावर लिहावी.**
5. पारितोषिक न मिळालेले साहित्य परत हवे असल्यास, पुरेसे टपाल हशील जोडावे.
6. स्पर्धेसंबंधी परिषदेचा निर्णय अंतिम राहील.
7. सर्व कथा डॉ.रंजन गर्गे, अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद, औरंगाबाद विभाग, विहंग, एन- 3/406, सिडको, औरंगाबाद 431 005 (दूरध्वनी क्र. 0240-2484591) येथे पाठवाव्यात.

**कथा पाठवण्याची अंतिम तारीख 30 सप्टेंबर, 2010 राहील.**

---

# प्राचार्य डॉ. चिं.श्री. कर्वे निबंध स्पर्धा 2010

## विद्यार्थी गट (बारावीपर्यंत) - विषय : आपल्या परिसरातील जैवविविधता

2010 हे युनेस्कोने जाहीर केलेले जैवविविधतेचे वर्ष आहे. जैवविविधता नसेल तर आपले जीवन एकसुरी होईल. आपल्याभोवती विविध नद्या आणि समुद्र आहेत. एरवी जाणवणार नाही पण रस्त्यावरून, परिसरातून चालताना नीट पाहिले तर अनेक प्रकारची पिसे सापडतात. त्यावरून तर्क बांधता येतो की हे पक्षी आपल्या परिसरात आहेत. नदी, तलावापाशी बसून पाण्याकडे शांतपणे पाहिले तर मासे, बेडूक, कासव, कालव असे प्राणी दिसतात. आजूबाजूला विविध झाडे आहेत. कुत्रे-मांजरी, घोडे, बैल, गाई, म्हशी असे नाना प्राणी दिसतात. अळ्या, कीटक, सूक्ष्म जंतू हे सगळे जैवविविधतेचे घटक आहेत. यांच्याशिवाय आपले चालेल का? त्यांच्यामुळे आपले आयुष्य कसे श्रीमंत झाले इत्यादी गोष्टींची माहिती या निबंधात येणे अपेक्षित आहे.

## खुला गट - विषय : पाणी समस्या आणि उपाय

जगात सगळ्यांत जास्त पाऊस भारतात पडतो, तसेच महाराष्ट्रातही सरासरीने भरपूर पाऊस पडतो. एका आकडेवारीप्रमाणे पडणाऱ्या एकूण पावसाच्या 15 टक्के एवढीच आपली घरगुती वापराची, शेतीची, उद्योगधंद्यांची, जनावरांची आणि नगरपालिकांची मिळून एकत्रित गरज आहे. असे जर आहे, तर पाणी टंचाई जाणवते ती का? पाण्याची नेमकी समस्या काय आहे? त्यावर कोणते उपाय आपल्याला सुचतात? सर्व उपाय सरकारी आणि नगरपालिकेच्या स्तरावरचेच आहेत की काही वैयक्तिक स्तरावरही अमलात आणता येतील, याची चर्चा या निबंधात येणे अपेक्षित आहे.

**निबंधस्पर्धा विभागीय तपासणीसाठी पाठवायचा अंतिम दिनांक 31 ऑगस्ट, 2010 आहे.**

**स्पर्धेचे नियम :**

1. महाराष्ट्राचे खालीलप्रमाणे भौगोलिक 5 विभाग आणि बृहन्महाराष्ट्राचा सहावा विभाग केला असून, विद्यार्थ्यांनी आणि खुल्या गटातील स्पर्धकांनी आपले निबंध खालीलप्रमाणे पाठवावेत. **दिलेल्या पत्त्यावर निबंध पाठविण्याची अंतिम तारीख 31 ऑगस्ट, 2010 ही राहील.**

2. **विभाग 1 - मुंबई शहर व कोकण विभाग**

   मुंबई, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यांतील स्पर्धकांनी आपले निबंध, डॉ. ह. शा. भानुशाली, अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद, ठाणे विभाग, कौशल्य, डॉ. आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी पथ, ठाणे 400 601 यांच्याकडे पाठवावेत.

   **विभाग 2 - दक्षिण महाराष्ट्र विभाग**

   सातारा, कोल्हापूर, सांगली, पुणे, सोलापूर, अहमदनगर या जिल्ह्यांतील स्पर्धकांनी आपले निबंध, श्री. शिवाजीराव पवार, अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद कोल्हापूर विभाग, श्रीनिवास 1708-ई, राजारामपुरी, आठवी गल्ली, कोल्हापूर 416 008 येथे पाठवावेत.

   **विभाग 3 - उत्तर महाराष्ट्र विभाग**

   जळगाव, धुळे, नाशिक, नंदुरबार या जिल्ह्यांतील स्पर्धकांनी आपले निबंध डॉ. राजेंद्र आहेरे, कार्यवाह, मराठी विज्ञान परिषद, साक्री विभाग, 12 प्रतिक, अकलाडे नगर, साक्री, जि. धुळे 424 304 यांच्याकडे पाठवावेत.

   **विभाग 4 - मराठवाडा विभाग**

   औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, नांदेड, लातूर, परभणी, जालना, हिंगोली या जिल्ह्यांतील स्पर्धकांनी आपले निबंध डॉ. मन्मथ माळी, कार्यवाह, मराठी विज्ञान परिषद, उमरगा विभाग, द्वारा आदर्श महाविद्यालय, उमरगा, जि. उस्मानाबाद 413606 यांच्याकडे पाठवावेत.

   **विभाग 5 - विदर्भ विभाग**

   चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती, अकोला, भंडारा, नागपूर, वर्धा, बुलढाणा, गडचिरोली, वाशिम, गोंदिया या जिल्ह्यांतील स्पर्धकांनी आपले निबंध प्रा. अशोक भड, अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद, नागपूर विभाग, वसुंधरा, 20, प्रगती नगर, मेडिकल कॉलनी, भगवान नगरजवळ, नागपूर 440027 यांच्याकडे पाठवावेत.

   **विभाग 6 - बृहन्महाराष्ट्र**

   महाराष्ट्राबाहेरील वडोदरा, गोवा, बेळगाव इत्यादी ठिकाणच्या स्पर्धकांनी आपले निबंध श्री. अरुण मुजुमदार, उपाध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद, वडोदरा विभाग, 11-12 सरगम अपार्टमेंट, पिरामितर रोड, दांडिया बाझार. वडोदरा 390 001 यांच्याकडे पाठवावेत.

3. प्रत्येक भौगोलिक विभागातील प्रत्येक गटासाठी पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकांच्या निबंधांना अनुक्रमे रु. 300/-, रु. 200/- आणि रु. 100/- ची पारितोषिके दिली जातील. **विभागाने निर्णय मध्यवर्तीस स्वतंत्रपणे कळविल्यावर पारितोषिकांची रक्कम थेट विजेत्यांना मध्यवर्तीकडून पाठविली जाईल. ही पारितोषिके रमाकांत टिपणीस स्मृती प्रित्यर्थ दिली जातात.**

4. प्रत्येक भौगोलिक विभागातील पहिले तीन निबंध अंतिम परीक्षणासाठी डॉ.रंजन गर्गे, अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद औरंगाबाद विभाग, विहंग, एन-3/406, सिडको, औरंगाबाद 431 005 येथे **30 सप्टेंबर, 2010 पर्यंत पाठवावेत.** निरनिराळ्या भौगोलिक विभागांकडून आलेल्या निबंधांचे परीक्षण राज्यस्तरावर पुन्हा स्वतंत्रपणे होईल. त्यांतील पहिल्या तीन क्रमांकांना खुल्या गटासाठी अनुक्रमे रु.1000/-, रु. 750/- आणि रु. 500/-, तर विद्यार्थी गटासाठी अनुक्रमे रु. 600/-, रु. 400/- आणि रु. 300/- अशी पारितोषिके दिली जातील.

   वरील दोन्ही गटांची प्रत्येकी तीन अंतिम पारितोषिके आणि कथेची पारितोषिके पंचेचाळिसाव्या अखिल भारतीय मराठी विज्ञान अधिवेशनात दिली जातील. हे अधिवेशन 18, 19 डिसेंबर 2010 रोजी बोर्डी (जि. ठाणे) येथे होईल. विजेत्यांना जाण्यायेण्याचा, रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाचा अथवा एस.टी.चा प्रवासखर्च मराठी विज्ञान परिषद, ठाणे विभागातर्फे दिला जाईल. विद्यार्थी गटांतील विद्यार्थी विजेत्यांबरोबर येणाऱ्या एका प्रौढ व्यक्तीचा प्रवासखर्चही देण्यात येईल. **मात्र सर्व विजेत्यांनी आणि बरोबरच्या व्यक्तींनी अधिवेशनाचे प्रतिनिधी शुल्क स्वत:चे स्वत: भरायचे आहे.** अधिवेशनासंबंधी अधिक माहिती श्रीमती उर्मिला करमरकर, अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद बोर्डी विभाग, बिल्वदल, सोनवाडी रस्ता, बोर्डी, ता. डहाणू, जि. ठाणे 401 701 दूरध्वनी : (02528) 254218

5. स्पर्धेत त्या-त्या ठिकाणी उल्लेख केलेल्या गटांच्या पातळीप्रमाणे कोणासही भाग घेता येईल. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क नाही. निबंध कागदाच्या एका बाजूस, सुवाच्य अक्षरांत लिहावा. **मात्र, ज्या व्यक्तीस निबंध स्पर्धेत दोनदा पारितोषिके मिळाली आहेत, त्याने परत भाग घेऊ नये.**

6. शब्दसंख्या 1500 ते 2000 असावी. लिखाण कागदाच्या एकाच बाजूला असावे. स्वहस्ताक्षरात असल्यास उत्तम. कागद ए-4 आकाराचा असावा.

7. साहित्याबरोबर लेखकाने आपले संपूर्ण नाव आणि पिनकोडसह पत्ता लिहावा. तसेच संपर्क दूरध्वनी क्रमांक, एस.टी.डी. कोडसहित द्यावा. शिवाय इ-मेल संपर्क असल्यास, तो पत्ताही द्यावा. **शीर्षकासह ही सर्व माहिती पहिल्या पानावर लिहावी.**

8. बक्षिसासाठी पात्र न ठरलेल्यांना साहित्य परत हवे असल्यास आणि योग्य टपालहशील बरोबर पाठवले असल्यास स्पर्धकास ते परत पाठवले जाईल. निबंधांमध्ये चित्रे चिकटवू नयेत.

9. **विभागांनी भौगोलिक विभागीय स्तरावरील निबंध स्पर्धा निर्णयासाठी आपापल्या विभागातील दोन-दोन परीक्षक नेमून, निर्णय लावून अंतिम परीक्षणासाठी पहिले तीन निबंध मराठी विज्ञान परिषद, औरंगाबाद विभागाकडे दि. 30 सप्टेंबर, 2010 पर्यंत पाठवावेत. मात्र कथांचे परीक्षण विभाग पातळीवर न करता ते फक्त मराठी विज्ञान परिषद, औरंगाबाद विभागामार्फत एकत्रितपणे राज्यपातळीवरच होईल.**

10. स्पर्धेसंबंधीचा अंतिम निर्णय **मराठी विज्ञान परिषद, औरंगाबाद** विभागाचा राहील.

11. स्पर्धेसाठी विस्तृत माहिती मराठी विज्ञान परिषद मध्यवर्ती कार्यालय, विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई 400022 दूरध्वनी क्र. 24054714 / 24059268 येथे मिळेल. इ-मेल : office@mavipamumbai.org संकेतस्थळ : www.mavipamumbai.org